# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ द्वारा संचालित विद्यापीठ)

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.

दूरध्वनी कार्यालय: ०७१२–२५२२९९१ फॅक्स : ०७१२–२५५५७०१


## अधिसूचना

क्रमांक : रातुमनावि/साप्र/विसनि/२०१०/१ दिनांक : १२ जुलै, २०१०

## पदवीधरांची नोंदणी

या अधिसूचनेद्वारे सर्व संबंधीतांना सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम ९९ व निर्देश क्रमांक १०(ओ)/२००० नुसार नोंदणीकृत पदवीधरांच्या नोंद पुस्तात नावाची नोंद करण्यासाठी, पात्र पदवीधरांकडून विहीत नमून्यात आवेदनपत्रे मागविण्यात येत आहे. ज्या पदवीधरांना नोंदणीकृत पदवीधरांच्या नोंद पुस्तात नोंदणी करावयाची असेल अशा पदवीधरांकरिता नोंदणी अर्ज **''प्रपत्र–अ''**, रु. ५/– या दराने विक्रीकरीता विद्यापीठाच्या खालील केंद्रांवर अधिसूचना प्रकाशित झाल्याच्या दिनांकापासून आवेदनपत्र स्वीकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत कार्यालयीन वेळेत सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (कार्यालयीन सुटीचे दिवस वगळून) उपलब्ध होऊ शकेल.

* प्रकाशन विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे वि.भि. उपाख्य भाऊसाहेब कोलते ग्रंथालय, रामदासपेठ, नागपूर.
* राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे उपकेन्द्र, गडचिरोली, ता. जि. गडचिरोली.

विहीत नमून्यातील भरलेले आवेदनपत्र **''प्रपत्र–अ''** खालील नमूद आवश्यक दस्ताऐवजांसह, नोंदणी शुल्क रु.२५/– (अक्षरी रुपये पंचवीस फक्त) कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांचे नावे राष्ट्रीयकृत बॅंकेचा दर्शनी धनाकर्ष (Demand Draft) अथवा रोख रक्कम विद्यापीठाचे किंवा गडचिरोली येथील विद्यापीठ उपकेन्द्राचे रोख पटलवर (कॅश काऊंटरवर) भरुन रक्कम जमा केलेल्या पावतीच्या प्रतीसह **''निवडणुक कक्ष, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविन्द्रनाथ टागोर मार्ग, महाराजबाग चौक, नागपूर किंवा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे गडचिरोली उपकेन्द्र, ता. जि. गडचिरोली''** येथे कार्यालयीन वेळेत **सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (कार्यालयीन सुटीचे दिवस वगळून)** स्वीकारण्यात येतील. विहीत नमुन्यातील आवेदनपत्र **''प्रपत्र–अ''** स्वीकारण्याची **अंतिम तारीख दिनांक १२ ऑगस्ट, २०१० पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत राहील.**

**टिप :**

१. विद्यापीठ निर्देश क्रमांक १०(ओ)/२००० मधील अटी व शर्ती बाबतची माहिती आवेदनपत्र **''प्रपत्र–अ''** सोबत जोडली आहे.

२. **नोंदणी करण्याकरिता नोंदणी अर्ज प्रपत्र–अ सोबत पृष्ठ्यार्थ खालील दस्ताऐवज जोडणे आवश्यक आहे.**

* पदवी प्रमाणपत्राची (Degree Certificate) महाविद्यालयाचे प्राचार्यांनी वा राजपत्रित अधिकाऱ्यानी साक्षांकीत केलेली छायांकीत प्रत.
* जे विद्यार्थी पदवी परीक्षा उत्तीर्ण झाले असून पदवी प्रमाणपत्र प्राप्त करण्यास पात्र आहेत अशा विद्यार्थ्यांनी तात्पुरते (प्रोव्हिजनल) पदवी प्रमाणपत्राची, महाविद्यालयाचे प्राचार्यांनी वा राजपत्रित अधिकाऱ्यानी साक्षांकीत केलेली छायांकीत प्रत.
* ज्या पदवीधरांनी यापूर्वी नोंदणी केली आहे, अशा पदवीधरांना पुन्हा पदवीधर नोंदणी आवेदनपत्र **''प्रपत्र–अ''** सादर करण्याची आवश्यकता नसून त्यांना नोंदणीकृत पदवीधर निवडणूक यादीत त्यांच्या नावाचा समावेश करण्याकरिता **''प्रपत्र–ब''** सादर करावयाचे आहे. **''प्रपत्र–ब''** विषयीची अधिसूचना विद्यापीठाद्वारे स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येईल. अधिसूचना निर्गमित केल्याच्या दिनांकापासून **''प्रपत्र–ब''** उपलब्ध करण्यात येतील.

३. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात वास्तव्यास असलेल्या महाराष्ट्रातील इतर अकृषी विद्यापीठाचे पदवीधर असलेल्या व्यक्ती आपले नाव राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदवीधर मतदार यादीत नोंदवू इच्छित असतील अशा पदवीधरांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील आपल्या वास्तव्याचे पुराव्यासह (मतदान ओळखपत्र, मालमत्तेचे कागदपत्र किंवा रहवाशी असल्याबाबत शासनाने निर्धारित केलेल्या दस्ताऐवजाची साक्षांकीत छायांकीत प्रत इत्यादी) पदवी प्रमाणपत्राची साक्षांकीत केलेली छायांकीत प्रत आणि महाराष्ट्रातील इतर अकृषी विद्यापीठाच्या नोंदणीकृत पदवीधरांच्या यादीतून त्यांचे नाव वगळल्याचे संबंधीत विद्यापीठाच्या कुलसचिवाचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्रातील इतर अकृषी विद्यापीठाच्या पदवीधरांच्या नोंदणी पुस्तात नाव नसल्याचे प्रतिज्ञापत्र आवेदनपत्रासोबत सादर करावे लागेल.

**कुलसचिव**
**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज**
**नागपूर विद्यापीठ**